## सहवेदना

### मुनीर शेख



**सोलापूर** : मुनीर मौला शेख (वय ५२) रा. लहान थोबडे मळा देगाव नाका सोलापूर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सून असा परिवार आहे. सोलापूर शहर-जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष दादर विभागातील सामाजिक कार्यकर्ते बशीर मौला शेख यांचे ते भाऊ होत.

### सुरेश आतनुरे



**सोलापूर** : सुरेश महादेव आतनुरे (वय ५२) यांचे आज निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, २ भाऊ, पत्नी ३ मुले असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा आज शनिवारी ठिक सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्यावर तुळजापूर वेस रुद्र भूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### अरुणसिंह जाधव



**वेळापूर** : मळोली (ता. माळशिरस) येथील अरुणसिंह फत्तेसिंह जाधव (वय ५०) यांचे आपघाती निधन झाले. त्यांच्यावर येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. माळशिरस पंचायत समितीचे सदस्य रणजितसिंह जाधव यांचे ते चुलत बंधू होते. त्यांच्या पाश्चात्य आई, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.


### सतीशकुमार परदेशी



**अक्कलकोट** : इंडियन मॉडेल स्कूल चे क्रीडाशिक्षक सतीशकुमार परदेशी (वय ४०) यांची अल्पशा आजाराने आज निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, एक मुलगा, पत्नी, वहिनी, भाऊ असा परिवार आहे.

# यकृताची घ्या काळजी; अन्यथा मुकावे लागेल जिवास

**सोलापूर/दीपक शिराळकर**



**आपल्या शरीरातील सर्व अवयव आपल्यासाठी खूप महत्वाचे असतात. आपल्या शरीरामध्ये यकृत हा एक महत्त्वाचा अवयव आहे. शरीरातील संक्रमणासोबत लढणे, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढणे, शरीरातील ब्लड शुगर कंट्रोल करने, प्रथिनाचे चे उत्पादन यासह शारीरिक कार्य, अन्नपचन अशा अनेक महत्त्वाची भूमिका यकृताची आहे.**


---

लिव्हर अर्थात यकृत खराब होण्याचे प्रमाण अधिक प्रमाणात दिसत आहे. जी यकृतामध्ये जास्त चरबी जमा झाल्यास ही समस्या निर्माण होते. मद्य जास्त सेवन केल्याने यकृतामध्ये चरबी जमा होऊ शकते. त्यामुळे मद्य सेवन न करणे महत्त्वाचे आहे. हे आपल्या सर्वांना माहीत आहे असे असूनही बहुतेक लोक त्याचे सेवन करतात. यामुळे लिव्हर अर्थात यकृत खराब होण्याचे प्रमाण ही वाढले आहे. अतिसेवनाने आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. याचा परिणाम आपल्या हृदयावर, पोटावर होतो. म्हणूनच आपल्या अल्कोहोलवर आळा घालणे महत्त्वाचे आणि निरोगी जीवन जगणे अधिक महत्त्वाचे ठरते. त्यामुळे मद्यपान व्यसनापासून दूर रहावे, असे डॉक्टर ही सांगतात...

> अल्कोहोलचे सेवन कमी करणे महत्वाचे आहे. व्यायाम महत्त्वाचे कारण व्यायामामुळे तुम्हाला निरोगी वजन राखण्यात मदत होईल. गोड पदार्थ टाळणे
>
> **- डॉ. अमोल पाटील** (लिव्हर स्पेशलिस्ट)

**सध्या रुग्णांमध्ये तरुणपिढी अधिक**

सध्या तरुणपिढी व्यसन जास्त प्रमाणात दिसून येत आहे. मानसिक ताणतणावामुळे तरुणपिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. त्यात ३५ ते ५० वर्षांतील तरुणांचा समावेश सर्वाधिक असल्याचे तज्ज्ञ डॉक्टर सांगतात.




### लक्षणे...

- वारंवार उलट्या किंवा मळमळ होत
- पोटाच्या आकारात बदल दिसू लागतो
- पोटाचा आकार वाढणे
- त्वचेवर खाज येणे
- कावीळ, डोळे पिवळे होणे
- पायांना सूज येणे
- झोपेचे चक्र बिघडते
- पचन आरोग्य बिघडते

### अशी घ्या काळजी

- निरोगी शरीराचे वजन राखा
- शरीरालील अल्कोहोल कमी करा
- निरोगी आहार घ्या
- यकृत निरोगी ठेवण्यासाठी दररोज व्यायाम करा
- काही औषधे टाळा
- यकृताची नियमित तपासणी करा
- आहारात फळे, भाज्या, दूध घ्या

# गुंतवणुकीतून महिन्याला १० टक्के व्याज मिळवून देण्याचे आमिष

## संगेवाडीत ६ लाखांची फसवणूक

**सांगोला/प्रतिनिधी**

तालुक्यातील संगेवाडी येथील सचिन शामराव वाघमारे (वय ३९) यास कॅमोअर एक्स एक्स कंपनीच्या पाच कर्मचाऱ्यांनी शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतवले की आठ ते दहा टक्के महिना परत मिळवून देऊ, असे आम्हीच दाखवून पाच लाख ८० हजार रुपयाची फसवणूक केल्याप्रकरी सांगोला पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत माहिती अशी की कॅमोअर एफ एक्स या कंपनीचे अजय कुमार आर्या, सौरभ चावला, बलजीत सिंग, करणजीत सिंग आणि राजेंद्र कुमार यांनी २२ जानेवारी २०२३ रोजी दुपारी दोन वाजता सोलापूर येथील सूर्या इंटरनॅशनल हॉटेलवर मीटिंग बोलावली होती त्यामध्ये सांगितले की शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवा आणि तुम्हाला आठ ते दहा टक्के महिना परतावा मिळवून देऊ असे अमिष दाखवून भुरळ पाडली सदरची रक्कम त्यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या गणेश ट्रेडिंग कंपनीच्या नावे असलेले खाते क्रमांक ६७०२०५६०१३६१ यावर पैसे भरण्यास सांगितले. दिनांक १२ जुलै २०२३ रोजी सकाळी अकरा वाजून ३५ मिनिटांनी दोन लाख ८० हजार रुपये रोखीने एटीएम मध्ये सोलापूर मध्ये आणि १३ जुलै २०२३ रोजी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास सांगोला बस स्थानकावरील पार्किंग मध्ये रोख तीन लाख रुपये मला देण्यास भाग पाडले आधार कार्ड पॅन कार्ड बँक पासबुक अशी कागदपत्रे घेऊन डिमॅट अकाउंट उघडले नाही कसलाही परतावा दिला नाही नंतर सर्वांनी त्यांचे मोबाईल बंद केले वेबसाईट बंद केली डिसेंबर २३ आणि जानेवारी २४ मध्ये झूम मीटिंग घेऊन पैसे परत देण्याचे पुन्हा आमिष दाखवले त्यानंतर आज पर्यंत कसलाही परतावा दिला नाही म्हणून फसवणूक झालेले संगेवाडी येथील सचिन शामराव वाघमारे यांनी आर्या चावला बलजीत सिंग व राजेंद्र कुमार यांचे विरोधात सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल मोहोळकर करीत आहेत

**दोघांना चार वर्ष शिक्षा अन ५० हजार दंड**

लोकसेवक संतोष जनार्दन ठाकूर तत्कालीन वरिष्ठ श्रेणी लिपिक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय सोलापूर. (सध्या सेवानिवृत्त) व उमेश प्रकाश काळे तत्कालीन प्रयोगशाळा परिचय श्री महालक्ष्मी प्रशाला सोलापूर या दोघांना जिल्हा न्यायाधीश -३ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सोलापूर योगेश राणे यांनी प्रत्येकी चार वर्ष कैद शिक्षा आणि प्रत्येकी ५० हजार रुपयांचा दंड केला आहे.

लोकसेवक संतोष जनार्दन व उमेश प्रकाश काळे या दोघांनी प्रलंबित पगार, बक्षीस बिल व उर्वरित रक्कम काढण्यासाठी लाचेची मागणी करून २३ हजार रुपयांची लाच स्विकारली होती. याबाबत बझार पोलीस ठाणे, गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

# ७६ हजारांची किडकी सुपारी जप्त अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**सोलापूर/प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाला रोजी विशेष भरारी पथकातील अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सोलापूर येथील मार्केट यार्ड चौकामध्ये अशोक लेलंड वाहन क्र. (केए-१४, सी- ७५१५), (केए-१४, सी-०८५०) व (केए-१४, सी-४६१९) या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रंगमिश्रीत व किटकबाधीत सुपारीची वाहतूक होत असल्याचे आढळून आले.

या ठिकाणी अन्न सुरक्षा अधिकारी रेणुका पाटील यांनी किटकबाधीत व रंग मिश्रीत सुपारी या अन्न पदार्थाचे नमुने घेऊन उर्वरित ७३ हजार ४९४ किलो किंमत ७६ लाख ४३ हजार ३७ रुपयाचा साठा कमी दर्जाच्या संशयावरुन जप्त करुन ताब्यात घेतला असून, सदर प्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत पुढील कारवाई सुरु आहे. ही कारवाई विशेष भरारी पथकाचे सहायक आयुक्त देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे, उमेश भुसे व रेणुका पाटील तसेच नमुना सहाय्यक श्रीशैल हिटनळळी यांच्या पथकाने केली.

# पंढरीत महिलांसाठी रंगणार 'होम मिनिस्टर'ची मैफिल

**युवती-महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : डॉ. सौ. प्रणिता भालके यांचे आवाहन**

**पंढरपूर/प्रतिनिधी**



पंढरपूर शहराच्या विविध भागांमध्ये महिलांच्या आवडीचा होम मिनिस्टर हा कार्यक्रम होणार आहे. लोकनेते स्व.आ.भारत नाना भालके फाउंडेशन पंढरपूर-मंगळवेढा यांच्या वतीने सन मराठी चॅनल प्रस्तुत खास सर्व महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित केला आहे. अशी माहिती लोकनेते स्व.आमदार भारत नाना भालके फाउंडेशनच्या संचालिका डॉ. सौ. प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी दिली.

महिलांसाठी हा खास बाब म्हणून कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे. होम मिनिस्टर हा कार्यक्रम पंढरपूरात शनिवार दि २९ जून २०२४ रोजी सायंकाळी ४:३० वाजता मातोश्री मीराबाई महाराज मठ, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर तर रविवार दि ३० जून २०२४ रोजी सायं ४:३० रोजी कालिकादेवी मंदिर कालिकादेवी चौक तर याच दिवशी सायंकाळी ६:३० मलपे चौक इसबावी, पंढरपूर या ठिकाणी होम मिनिस्टर, हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमासाठी सर्व महिलांनी, तरुणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. सौ प्रणिता भगीरथ भालके यांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी सर्व महिलांना मोफत प्रवेश दिला जाणार असून होम मिनिस्टर खेळा आणि बक्षिसे जिंका या कार्यक्रमासाठी जिंकणाऱ्या महिलांसाठी पैठणी साडी सह भरघोस बक्षीसे दिले जाणार आहेत. या कार्यक्रमाचे निवेदक जयवंत भालेकर हे करणार आहेत. हा कार्यक्रम लोकनेते स्वर्गीय आमदार भारत नाना भालके फाउंडेशन पंढरपूर मंगळवेढा आयोजित करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय ॲबॅकस स्पर्धेत अकलूजची एस. ॲकडमी प्रथम

**४६ जणांचा प्रत्यक्ष स्पर्धेत सहभाग; इतर जिल्ह्यातून विद्यार्थ्यांचा सहभाग**

**अकलूज/प्रतिनिधी**



**सोलापूर : येथे झालेल्या प्रोॲक्टिव्ह अबॅकस राष्ट्रीय स्पर्धा २०२३- २४ मध्ये अकलूजच्या एस ॲकेडमी च्या घेऊन १९ विद्यार्थी वेगवेगळ्या विभागातून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाने यशस्वी होत मानाच्या ट्रॉफीचे मानकरी ठरले**

सोलापूर येथे झालेल्या प्रोॲक्टिव्ह अबॅकस राष्ट्रीय स्पर्धा २०२३- २४ मध्ये अकलूजच्या एस ॲकेडमी च्या घेऊन १९ विद्यार्थी वेगवेगळ्या विभागातून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाने यशस्वी होत मानाच्या ट्रॉफीचे मानकरी ठरले.

या राष्ट्रीय स्पर्धेत लातूर, सोलापूर, धाराशिव व सातारा या इतर जिल्ह्यातूनही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.ही स्पर्धा ६ मिनिटात १०० गणिते अचूक सोडवण्याची होती. या स्पर्धेत शुभांगी उमेश खोचरे ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तर संस्कृती सज्जन पवार,अन्वीत रणजीत जंवजाळ,विराज महेश मिटकल,विश्वरूप सागर माने-देशमुख,सौमिक शिवकुमार मदभावी, कार्तिक सुनील पवार, स्वरा अनिल माळी हे द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

तृतीय क्रमांक-अर्णव राजेंद्र लावंड, सानवी दीपक बनकर,प्रणिती प्रकाश जाधवर,,शौर्य संतोष रजपूत, पियुषा विक्रम इंगळे, श्रीकृष्ण महेश जोशी यांनी प्राप्त केला. तसेच चतुर्थ क्रमांकाचे मानकरी उदयराजे शीतलकुमार लवटे,स्वरांजली विनोद चौगुले, निकुंज अर्पण कुदळे,रुद्र बाबासाहेब माने-देशमुख हे ठरले.

या स्पर्धेत लावण्या शिवाजी याडगे, श्रेयश दर्लिंग गुरव,अर्जुन आप्पासाहेब माने देशमुख,अन्विता महेश शिंदे,अद्वैत राजेंद्र पांढरे, शार्दुल सत्यजित बनकर, वेदांत महेश पवार, सिफा साहिल तांबोळी, अहिल्या बाबासाहेब गोफणे,रुद्रश्री प्रशांत घुले, मोहित मनोज मोरे,आदिती अभिमान काटकर, विश्वजीत अजित वाघ, अमेय गणेश आव्हाड,संस्कृती अमोल माने, राजवीर अनिल शिंदे, मनस्वी दीपक मेहकर, सोनाक्षी भारत पराडे, स्वरांजली राहुल पराडे, अविनाश सुनील पवार,अभिमन्यू अनिल माळी, श्रेया कमलाकर फरताडे,अधिराज कमलाकर फरताडे हे सर्व विद्यार्थी सहभागी होऊन आपल्या ज्ञानाची चमक दाखवून चषकाचे मानकरी ठरले.

यापूर्वी एस ॲकेडमी ही सलग पाच वर्ष उत्कृष्ट अबॅकस केंद्र नामांकन पात्र आहे . यावर्षी २०२४ चा सलग दुसऱ्यांदा बेस्ट परफॉर्मन्स व बेस्ट सेंटर पुरस्कार मिळवून चषक व दहा हजार रुपये देऊन एस अकॅडमी ला सन्मानित करण्यात आले .

# बाळासाहेब माने यांची सीआयडीपदी नियुक्ती

**उत्तम जानकर यांच्या हस्ते सन्मान**

**वेळापूर/प्रतिनिधी**



**वेळापूर : पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब माने यांची सीआयडी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा उत्तमराव जानकर यांच्या वतीने गरुड बंगला येथे सन्मान करण्यात आला**

वेळापूर गरुड बंगला येथे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व माजी पंचायत समिती उपसभापती उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब माने यांची पोलीस विभागातील सी.आय.डी. (Crime Investigation Department) च्या पोलीस निरीक्षकपदी बढती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला, व मिळविलेल्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या.

यावेळी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य आर. बी. पवार. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष डॉ. धनंजय साठे. माजी पं. स. सदस्य अजय सकट, उघडेवाडी माजी सरपंच मोहन कचरे शिवाजी सुळे(वैराग), अमोल पनासे. काशिनाथ वावरे, धनाजी कोडग आदी उपस्थित होते.

**नावात बदल**

माझे अशिल सौ. मयुरी पवन बोमड्याल, रा. ९४/३५, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी दिलेल्या माहितीवरुन या जाहीर प्रकटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांचे दि. १४/४/२००० रोजी लग्न झालेले असून त्यांनी अद्यापही लग्नानंतर नाव बदलून घेतलेले नाही. तथापि त्यांना भविष्यात सरकारी कामकाजासाठी आपले नाव बदलून घेणे आवश्यक ठरले आहे.

लग्नापूर्वीचे नाव : **कु. वनिता भालचंद्र जटला**

लग्नानंतरचे नाव : **सौ. मयुरी पवन बोमड्याल**

जन्म दि. २०/०७/१९७९. तरी यापुढे नवीन नावाने त्यांची ओळख व्हावी याकरीता हे जाहीर प्रकटन देण्यात येत आहे. हे जाहीर प्रकटन दिले असे ता. २८/०६/२०२४.

सही/-
अॅड. सी.बी.शेख
सोलापूर. मो. ९७६५५५८७९०

**सोलापूर महानगरपालिका**

**ई-निविदा जाहीर प्रसिध्दीकरण**

आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी महाराष्ट्र राज्यातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत सोलापूर शहरासाठी पर्जन्य जलवाहिनी प्रकल्प कामासाठी र. रु. ८३, ४८, ५४, १८५/- इतक्या रकमेची ई-निविदा मागविली आहे. ई-निविदेचे तपशील http://mahatenders.gov.in वर दि. २८/०६/२०२४ पासून सकाळी १०.०० वाजता उपलब्ध आहे.

Tender ID-2024_SMC_1045949_1

क.दि. २८/०६/२०२४

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# वेळापुरात ग्रामीण जागरुकता कार्यानुभव उपक्रमाचा शुभारंभ

**वेळापूर/प्रतिनिधी**




**वेळापूर : रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्या सल्ला केंद्राचे उद्घाटन वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी नानासाहेब मुंगूसकर महादेव भाऊ ताटे कैलास सुरवसे दीपक राऊत अमृतराव माने देशमुख व कृषी कन्या व ग्रामस्थ उपस्थित होते.**

वेळापूर तालुका माळशिरस येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव उपक्रम अंतर्गत कृषी सल्ला केंद्राचे उद्घाटन वेळापूर ग्रामपंचायत येथे वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे जेष्ठ महादेवभाऊ ताटे, दत्तात्रय माने विठ्ठल म्हेत्रे रंग दादा माने अॅड. दत्तात्रेय आडत ग्रामपंचायत सदस्य दीपक राऊत अमृतराव माने देशमुख उमेश माने देशमुख महावीर मुंगुस्कर शंकर बनकर ताहीर बागवान तसेच बचत गटाच्या महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या यावेळी ज्येष्ठ प्रगतशील बागायतदार व कृषी विषयाची सखोल माहिती असलेले महादेव भाऊ ताटे यांनी सर्व गावकऱ्यांना आधुनिक शेती त्याचे फायदे मालाची विक्रि सेंद्रिय खते याबद्दल मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रजनीश बनसोडे ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे यांनी सर्वांना मार्गदर्शन करून सर्व कृषी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर जी नलावडे कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक एस एम एकतपुरे , प्राध्यापक एस व्ही कल्याणी यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार कृषी कन्या प्रतीक्षा होनमाने, नम्रता मोरे, शिवानी स्वामी, स्वप्नाली काकडे, मुस्कान शेख वैष्णवी कदम, जान्हवी जाधव, वृषाली पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पिकाची उत्पन्न वाढ, हिरवळीची खते, माती परीक्षण, गांडूळ खत, सेंद्रिय खतांचा वापर , आधुनिक तंत्रज्ञान, पिकांचे एकात्मिकरण , रोग व किड नियंत्रण याबद्दल माहिती दिली.

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात

संकलन - अभिलेख कक्ष

दुरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email-tahakkalkot@gmail.com

जा.क्र.२०२४ अभिलेख/कावि/३८३/२०२४ दि.२८/०६/२०२४

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

**प्रति.**
**श्री. श्रीशैल शिवराया पेडसंगे**
**रा. बणजगोळ ता. अक्कलकोट जि. सोलापूर ... अर्जदार**
**विरुध्द**
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय**
**ग्रामपंचायत बणजगोळ ता अक्कलकोट ... सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील श्री. श्रीशैल शिवराया पेडसंगे रा. बणजगोळ ता. अक्कलकोट यांच्या मुलाचा युवराज श्रीशैल पेडसंगे याचा जन्म दि. २३ / ११ / २००२ रोजी मौजे बणजगोळ ता. अक्कलकोट जिल्हा सोलापूर येथील राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार श्री. श्रीशैल शिवराया पेडसंगे यांनी त्यांच्या मुलाचा नावाने युवराज श्रीशैल पेडसंगे जन्म दाखला मिळण्याकामी जन्म - मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दिनांक २४/०६/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या मुलाचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २८/०६/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
(विनायक मगर)
तहसीलदार अक्कलकोट

**प्रतिलीपी** - १) ग्रामसेवक, बणजगोळ, ता. अक्कलकोट यांनी उपरोक्त नोटीस ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावे.

२) बारानिशी लिपीक तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर डकवून प्रसिध्द करावे.